सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२२ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

घड्याळ चिन्ह अजित पवारांकडेच राहणार; शरद पवारांच्या राष्ट्रवादीची याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२मुंबई

अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे असलेले घड्याळ चिन्ह विधानसभा निवडणुकीदरम्यान गोठवावे, अशा प्रकारची मागणी करणारी याचिका शरदचंद्र पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने शरद पवारांच्या पक्षाची ही मागणी फेटाळून लावलीय. शरद पवारांच्या मूळ पक्षाचे म्हणजेच राष्ट्रवादीचे जुने निवडणूक चिन्ह असलेले घड्याळ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला वापरण्यास मनाई करावी, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली होती. परंतु त्यावर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयानं अजित पवारांच्या पक्षाला दिलासा दिलाय.

येत्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवता येईल, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलाय. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला हा मोठा धक्का मानला जात असून, या निर्णयामुळे अजित पवार यांच्या पक्षाला ऐन निवडणुकीच्या तोंडावर मात्र मोठा दिलासा मिळालाय. अजित पवारांनी बंड केल्यानंतर शरद पवारांकडे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दावा केला होता. त्यानंतर मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष याची मालकी अजित पवारांकडे असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आला होता. त्यामुळे घड्याळ चिन्हदेखील अजित पवारांच्या पक्षाला देण्यात आले होते. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला तुतारी फुंकणारा माणूस हे चिन्ह देण्यात आले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या पक्षाने अजित पवारांच्या पक्षाला देण्यात आलेले घड्याळ चिन्ह गोठवण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात केली होती. त्यावर मंगळवारी न्यायालयाने निकाल देत घड्याळ चिन्ह गोठवण्यास नकार दिला, त्यामुळे घड्याळ चिन्ह अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला वापरण्याची परवानगी कायम राहिली आहे.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर याचिका

या याचिकेच्या सुनावणीदरम्यान अजित पवारांच्या वकिलांतर्फे या याचिकेच्या मागणीला जोरदार विरोध करण्यात आलाय. ऐन निवडणुकीच्या तोंडावर ही मागणी करता येणार नाही, आमच्या पक्षाच्या उमेदवारांना घड्याळ या चिन्हावर लढण्यासाठी पक्षातर्फे अधिकृत एबी फॉर्मदेखील उमेदवारांना देण्यात आल्याची माहिती वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाला देऊन त्यांचे लक्ष वेधले.

महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला ठरणार?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२मुंबई

गेल्या दोन दिवसांपासून विदर्भातील जागावाटपाच्या मुद्द्यावरुन काँग्रेस आणि ठाकरे गटात रस्सीखेच सुरु असल्याने महाविकास आघाडीत काहीसा तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर मविआतील ज्येष्ठ नेत्यांनी चर्चेचा सूत्रं हाती घेत मविआचे गाडे पुन्हा रुळावर आणले आहे. काँग्रेसचे नाना पटोले आणि ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्या आक्रमक वक्तव्यांमुळे मविआत तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे आता काँग्रेसने अनुभवी नेतृत्व असलेल्या बाळासाहेब थोरात यांच्याकडे चर्चेच सूत्रं सोपवली होती. बाळासाहेब थोरात यांनी मंगळवारी सकाळी मुंबईत येत प्रथम शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर ते मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी पोहोचले.

बाळासाहेब थोरात यांनी मातोश्रीवर प्रवेश केल्यानंतर महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीसाठीचा जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे. या फॉर्म्युलानुसार, काँग्रेस पक्ष ११० जागांवर लढणार होता. यापैकी ५ जागा चर्चेअंती कमी जास्त होण्याची शक्यता आहे. तर ठाकरे पक्ष ९० जागांवर लढणार होता. यामध्येही काही बदल होण्याची शक्यता आहे. त्यांच्या पाच जागा कमी होऊ शकतात. तर शरद पवार गट ७५ जागांवर लढणार होता. मात्र, आता तडजोड करण्यासाठी हा जागांचा आकडा वरखाली होण्याची शक्यता आहे.हे जागावाटप करताना मविआच्या मित्रपक्षांचाही विचार करण्यात आला आहे. या जागांचे वाटप झाल्यानंतर समाजवादी पक्षाला सामावून घेण्यासंदर्भात निर्णय होईल, असे सांगितले जाते. आज दुपारी मविआच्या नेत्यांची यशवंतराव चव्हाण सेंटरला बैठक पार पडेल. यानंतर ठाकरे गट, शरद पवार गट आणि काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे.

खेड शिवापुर टोल नाक्यावर नाकाबंदीत पुणे पोलिसांकडून ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२पुणे

विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केलीय. अशातच सोमवारी (२१ ऑक्टोबर) पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर सुरू असलेल्या नाकाबंदीत पुणे पोलिसांकडून ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम सत्ताधारी आमदाराची असल्याचं बोललं जात असून यावर शिवसेना (उध्दव ठाकरे) नेते संजय राऊत तसंच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देखील भाष्य केलंय. मात्र, याबाबत पुण्याचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांना विचारलं असता, या पैशाचा राजकीय संबंध काय? याचा अधिक तपास करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेच्या दृष्टीनं नाकाबंदी करत असताना पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटी रूपयांची रोख रक्कम जप्त केली. ज्या गाडीसह ही रक्कम जप्त करण्यात आली ती कार चक ४५ -ड २५२६ या क्रमांकाची असुन ती सांगोल्यातील अमोल नलावडे या व्यक्तीच्या नावावर असल्याचं समोर आलंय. रक्कम नेमकी कुठे नेली जात होती? या रक्कमेचा वापर कशासाठी होणार होता? याबाबत अधिक तपास सुरू आहे. याबाबत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख म्हणाले की, काल संध्याकाळी जवळपास सव्वा सहाच्या सुमारास खेड शिवापूर टोल नाक्यावर एक पांढऱ्या रंगाची इनोव्हा कार चेक करण्यात आली. या कारमध्ये काही रक्कम असल्याचं आढळलं. त्यानंतर कार पोलीस स्टेशनला नेण्यात आली. तिथं निवडणूक अधिकारी तसंच प्रशासनाला बोलवण्यात आलं आणि व्हिडिओ ग्राफी करत पंचनामा करण्यात आला. पंचनामा केल्यावर, जवळपास ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त केली आणि आयकर विभागाकडे पुढील चौकशीसाठी ही रक्कम देण्यात आली. सर्व नोटा या ५०० रुपयांच्या असून पूर्ण रक्कम ही ५ कोटी रुपयांची आहे. ही कार कोणाची आहे? याबाबत अधिक तपास सुरू आहे. कार मुंबईवरून कोल्हापूरला जात होती.

यादी नाही थेट शरद पवारांकडून एबी फॉर्मचं वाटप

पारनेरमध्ये शिवसेनेला धक्का देत राणी लंकेंना संधी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२मुंबई

आजपासून विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांना उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. काही दिवसापूर्वी भाजपने आपल्या ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील तब्बल १७ जणांना एबी फॉर्म दिले आहे.

या बातमीनुसार शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने देखील उमेदवारांना एबी फॉर्म देण्यास सुरुवात केली आहे. सध्या माहितीनुसार शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून खासदार निलेश लंकेंच्या पत्नी राणी लंकेसह आणखी दोन उमेदवारांना एबी फॉर्म दिले आहे. तर दुसरीकडे पुढील एक- दोन दिवसात महाविकास आघाडीकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर होणार असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरु आहे.

तर दुसरीकडे शरद पवार गटाकडून पारनेर विधानसभेसाठी राणी लंके यांना एबी फॉर्म दिल्याने पारनेर विधानसभा मतदारसंघात अनेक चर्चांना उधाण आले आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये ही जागा शिवसेनेला (ठाकरे गट) मिळणार असल्याची चर्चा होती. त्यामुळे या मतदारसंघात शिवसेनेकडून इच्छुक उमेदवार श्रीकांत पठारे यांनी तयारी देखील सुरु केली होती मात्र आता राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) राणी लंके यांना एबी फॉर्म दिल्याने राणी लंके पारनेर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवार असणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

तर दुसरीकडे राणी लंके यांच्यासह पक्षाने मुंबईतून घाटकोपर पूर्वसाठी राखी जाधव, चिपळूण विधानसभेसाठी प्रशांत यादव यांना एबी फॉर्म देत कामाला लागण्याचे आदेश दिले असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच शिवसेनेकडून (ठाकरे गट) देखील उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात येत असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात जोराने सुरु आहे.

राऊत सर्कशीतील जोकर...

भाजप आमदार नितेश राणेंची खोलवर घाव करणारी टीका

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ मुंबई

आमच्या नेत्यांच्या आणि संजय राऊतांच्या भेटीच्या चर्चेवरून संजय राऊतांची मोठी तडफड झाली. एक बापाचे असाल तर.. अशा शब्दांत अमित शहा आणि इतर नेत्यांच्या भेटीवर हे बोलले. परंतु, ही बातमी कुणी बाहेर आणली? हे पाहिलं पाहिजे. ही माहिती काँग्रेसच्या सुत्रांनी बाहेर आणली. त्यामुळे राऊतांची मजल इतपर्यंत गेली की, त्यांनी ज्यांच्यासोबत जागावाटपची चर्चा सुरू आहे त्या काँग्रेसच्या नेत्यांचा बाप बाहेर काढला आहे असं म्हणत संजय राऊत यांच्या टिकेला भाजप आमदार नितेश राणे यांनी जोरदार उत्तर दिल. ते पत्रकारांशी बोलत होते.

तुम्ही जर भेटला नाहीत. तुमच्या मनात काही काळबेर नाही, चोर के दाढी मे तिनखा नसेल तर तुम्हाला राग येण्याचं काहीच कारण नाही. ज्या अर्थी तुमची तडफड होत आहे त्या अर्थी दाल मै कुछ काला हे अन्यथा पूर्ण दाळच काळी आहे असा टोलाही नितेश राणे यांनी लगावला आहे. तसंच, त्यांनी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही घणाघात केला आहे.

उद्धव ठाकरे हे कधी बाळासाहेब ठाकरेंचे झाले नाहीत. ते काँग्रेसचे होणार आहेत का? याचा काँग्रेसच्या नेत्यांनी विचार करावा. तसंच, अशा भरोसा नसलेल्या राऊतांवर विश्वास ठेवावा असंही राणे यावेळी म्हणाले आहेत. यावेळी त्यांनी, आमदार शहाजीबापू पाटील यांच्या गाडीत पैसे सापडले असा आरोप राऊत यांनी केलाय. त्यावर बोलताना, राऊत यांचा कोणता आरोप खरा ठरलाय असं म्हणत त्यांना कुणी गांभीर्याने घेत नाही असं म्हटलं आहे.

राजकीय पत्रकारांनी राऊत यांच्याकडे जाण्यापेक्षा मनोरंजन क्षेत्रातील पत्रकारांनी राऊतांच्या मुलाखती घेण्यासाठी जाव्यात. तसंच, यांचे फिल्मी डायलॉग पाहता एकता कपूर यांनी राऊतांना एखाद्या सिरीअलमध्ये काम द्याव असंही राणे यावेळी म्हणालेत. तसंच, महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या यादीने भाजपची नाही. परंतु, काँग्रेसच्या यादीने मातोश्रीची झोप उडेल असा टोलाही राणे यांनी यावेळी राऊतांना लगावला आहे.

उद्धव ठाकरेंच्या आणि भाजपाच्या बैठका सुरू, निवडणुकीनंतर एकत्र येणार; प्रकाश आंबेडकरांचा मोठा गौप्यस्फोट

विदर्भ प्रजासत्ताक दि.२२मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांच्या जागावाटपावर चर्चा सुरू आहे. वंचित बहुजन आघाडीने मोठी तयारी केली असून उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. दरम्यान, आता उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाच्या बैठका सुरू असल्याचा मोठा गौप्यस्फोट प्रकाश आंबेडकर यांनी केला. यामुळे आता राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. प्रकाश आंबेकर यांनी आज गोंदिया येथे पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी हा गौप्यस्फोट केला. आंबेडकर म्हणाले, मी सगळ्या लोकशाहीवादी आणि त्याचबरोबर मुस्लिम समाजाला आवाहन करत आहे की, उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या आणि भाजपाची बैठका सुरू आहेत. विधानसभा एकदा संपली की हे परत एकदा भाजपासोबत जातील, असा मोठा गौप्यस्फोट आंबेडकर यांनी केला. याची भीती व्यक्त केली जात आहे. म्हणून काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांना मुस्लिम समाज त्यांच्याकडून आश्वासन घ्यायला सांगत आहे. आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी कशा पद्धतीने त्यांना आश्वासन देत आहे हे पाहणे महत्वाचे आहे, असंही आंबेडकर म्हणाले.

बबलू देशमुखांना 'सेफ' करण्यासाठी भाजपने दिला डमी उमेदवार

राणांची नवी चाल असल्याची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा महासंग्राम सुरू झाला असून भाजपने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करीत आघाडी घेतली आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर मतदारसंघात भाजपने निष्ठावंत व चर्चेत असलेल्या उमेदवारांना डावलून प्रवीण तायडे सारख्या नवख्या उमेदवाराला उमेदवारी दिल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. बबलू देशमुख यांना सेफ झोन मध्ये ठेवण्यासाठी राणा दांपत्याने भाजपचे जिल्हाध्यक्ष खासदार

डॉक्टर अनिल बोंडे यांना हाताशी धरून नवखा व डमी उमेदवार दिल्याची चर्चा खुद्द भाजपमध्ये रंगली असून भाजपच्या या संभ्रमात टाकणाऱ्या भूमिकेमुळे निष्ठावंत भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करीत पक्षाशी दोन हात करण्याची तयारी चालविली आहे .गेल्या काही दिवसापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांची चांदुर बाजार येथील सभा रद्द झाल्याची घटना घडली होती. त्यावेळी त्यांनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व अचलपूरचे संभाव्य काँग्रेस उमेदवार बबलू देशमुख यांच्यावर आरोप करीत काँग्रेसमध्ये भाजपचे स्लीपर सेल कार्यरत असल्याचा दावा केला होता तसेच बबलू देशमुख हे भाजपवासी होणार अशी चर्चा देखील रंगली होती. आता भाजपने प्रवीण तायडे सारखा डमी उमेदवार देत बबलू देशमुख यांना सेफ करीत भाजपच्या खांद्यावरून पंजा फडकविण्याची खेळी खेळल्याने या चर्चेला मोठे बळ मिळाले आहे. या सर्व खेळीमागे राणा दांपत्य असून त्यांनी भाजप जिल्हाध्यक्ष डॉक्टर अनिल बोंडे यांना हाताशी धरून भाजपच्या निष्ठावंत आणि चर्चेतील उमेदवारांना डावलून प्रवीण तायडे याला उमेदवारी मिळवून देण्याची खेळी खेळण्याची चर्चा खुद्द भाजपच्या अंतर्गत गोटात रंगली आहे. याबाबत दिल्लीत एक बैठक पार पडली असून या बैठकीमध्ये काँग्रेस मधून भाजपमध्ये आलेले खा. अशोक चव्हाण, खा. अनिल बोंडे, रवि राणा व बबलू देशमुख सामील होते. बबलू देशमुख आणि अशोक चव्हाण यांचे संबंध सर्वश्रुत आहेत त्यामुळे या बैठकीमध्ये बबलू देशमुख यांना कोणत्याही प्रकारे निवडून आणा त्यांना नंतर भाजप मध्ये प्रवेशित करून घेण्याची जबाबदारी माझी असे खा चव्हाण यांनी संबंधितांना शब्द दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.या सर्व होणाऱ्या घटनांबाबत बबलू देशमुख यांचे असलेले मौन, बबलू देशमुख यांच्याबद्दल राणा दाम्पत्याने कोणत्याही प्रकारची न केलेली टिप्पणी यामुळे या चर्चेला दुजोरा मिळत आहे.

मोठ्या षडयंत्राची शक्यता

केंद्रात व राज्यात सत्तेत असलेल्या भाजप सारख्या एका मोठ्या राष्ट्रीय पक्षाने विरोधी पक्षाच्या उमेदवारासाठी नवखा व डमी उमेदवार दिला यामागे मोठे राजकीय षडयंत्र असल्याची शक्यता भाजपच्या निष्ठावंतांनी व्यक्त केली असून असे प्रकार जर झाले तर जिल्ह्यात भाजपचे अस्तित्वच राहणार नाही अशी चर्चा आहे.

भाजपने बळीचा बकरा बनविले

भाजपने प्रवीण तायडे यांच्या रूपात उमेदवार दिल्याच्या संदर्भात बोलताना बच्चू कडू म्हणाले की माझ्या मतदारसंघात भाजपने एका नवख्या उमेदवारास उमेदवारी देऊन त्याला बळीचा बकरा बनविला आहे. भारतीय जनता पक्षाला सत्ता मिळावी म्हणून अनेक वर्ष ज्यांनी कठोर परिश्रम घेतले त्यांना उमेदवारी न देता पक्षाने नवख्या कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन काय साध्य केले हे कळायला मार्ग नाही असा सवाल करीत एकीकडे काँग्रेस मुक्त असा नारा भाजप देत आहे. आणि दुसरीकडे अचलपूर काँग्रेस युक्त करायचे असा भाजपचा फंडा असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

संपादकीय .....

'नंदनवना'तील काटेरी वाट

नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. उमर हे केंद्रशासित राज्याचे पहिलेच मुख्यमंत्री आहेत; पण उमर यांचा सत्तेचा मार्ग वाटतो तेवढा सोपा नाही, कारण कलम ३७० हटविल्यानंतर आणि केंद्रशासित प्रदेश झाल्यानंतर जम्मू-काश्मीरचे 'सत्ताकेंद्र' हे विकेंद्रित झाले आहे. पोलिस आणि कायदा सुव्यवस्था वगळता जम्मू-काश्मीर विधानसभा ही अन्य सर्व मुद्द्यांवर कायदा तयार करू शकते; पण यातही एक मेख आहे आणि ते म्हणजे राज्य सरकार राज्याच्या सूचीत सामील असलेल्या एखाद्या विषयावर कायदा करत असेल, तर त्याचा केंद्रीय कायद्यावर परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे.

कलम ३७० संपुष्टात आणल्यानंतर पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्सला यश मिळाले. काँग्रेसने नॅशनल कॉन्फरन्सला पाठिंबा दिल्याने त्यांच्या सत्तेचा मार्ग मोकळा झाला आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. उमर अब्दुल्ला हे केंद्रशासित राज्याचे पहिलेच मुख्यमंत्री आहेत; परंतु उमर यांचा सत्तेचा मार्ग वाटतो तेवढा सोपा नाही, कारण कलम ३७० हटविल्यानंतर आणि केंद्रशासित प्रदेश झाल्यानंतर जम्मू-काश्मीरचे 'सत्ताकेंद्र' हे विकेंद्रित झाले असून, ती जम्मू-काश्मीरच्या राजकारणासाठी महत्त्वाची बाब आहे. यापूर्वी उमर राज्याचे मुख्यमंत्री होते तेव्हा जम्मू-काश्मीर हे पूर्ण राज्य होते आणि आता केंद्रशासित राज्य आहे. तेव्हा जम्मू-काश्मीरच्या विधानसभेचा कार्यकाळ सहा वर्षांचा होता आणि आणि आता अन्य राज्यांप्रमाणे पाच वर्षांचा राहणार आहे. तेव्हा राज्याशी संबंधित निर्णय घेण्याचे सर्वाधिकार, कायदे तयार करणे या सर्व गोष्टी मुख्यमंत्रिपदाभोवती केंद्रित झाल्या होत्या; परंतु आज काही प्रमाणात नायब राज्यपालांचेही नियंत्रण राहणार आहे.

२०१९ नंतर जम्मू-काश्मीरची घटनात्मक व्यवस्था पूर्णपणे बदलली आणि आता तेथे सरकारपेक्षा नायब राज्यपालांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. २०१९ च्या कायद्यानुसार पोलिस आणि कायदा सुव्यवस्था वगळता जम्मू-काश्मीर विधानसभा ही अन्य सर्व मुद्द्यांवर कायदा तयार करू शकते; परंतु यातही एक मेख आहे आणि ती म्हणजे राज्य सरकार राज्याच्या सूचीत सामील असलेल्या एखाद्या विषयावर कायदा करत असेल तर त्याचा केंद्रीय कायद्यावर परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे. याशिवाय या कायद्यातील तरतूद पाहिली तर कोणतेही विधेयक किंवा दुरुस्ती विधेयक हे विधानसभेत नायब राज्यपालांच्या परवानगीशिवाय मांडता येणार नाही. त्यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये नायब राज्यपालच सर्वकाही आहेत. सरकारला पोलिस आणि कायदा व सुव्यवस्था वगळता अन्य प्रकरणांत कायदा तयार करण्याचा अधिकार दिला असला, तरी त्यासाठीही नायब राज्यपालांची परवानगी घ्यावी लागणार आहे. एवढेच नाही, तर नायब राज्यपालांचे प्रशासन आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागावरदेखील नियंत्रण राहील. याचाच अर्थ सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्तीही नायब राज्यपालांच्याच मंजुरीने कराव्या लागतील. याशिवाय नायब राज्यपालांनी एखाद्या कामावर घेतलेल्या निर्णयाबाबत आक्षेप घेता येणार नाही. त्यांनी आपल्या विवेकाचा वापर केला आहे की नाही किंवा वापर करायला हवा होता, असे म्हणता येणार नाही. त्यांच्या कोणत्याही निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येणार नाही. शिवाय निर्णय घेताना मंत्रिमंडळाची परवानगी घेतली नाही म्हणून त्यांच्या निर्णयावर बोट ठेवता येणार नाही.

दुसरीकडे काँग्रेसच्या खेळीने काश्मीरच्या नवीन सरकारसमोर पेच उभा राहिला आहे. काँग्रेसने उमर अब्दुल्ला यांना पाठिंबा दिला खरा, पण तो बाहेरून. याचा अर्थ काँग्रेस मंत्रिमंडळात सामील होणार नाही. जम्मू-काश्मीरमध्ये 'इंडिया' आघाडीचे सरकार असतानाही काँग्रेस पक्ष अब्दुल्ला यांच्या मंत्रिमंडलात सहभागी झाले नाही. काँग्रेसचा एकही सदस्य अब्दुल्ला यांच्या कॅबिनेटमध्ये मंत्री झाला नाही. विशेष म्हणजे शपथविधी सोहळ्यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, प्रियांका गांधी हे स्वत: सामील झालेले असतानाही त्यांनी मंत्रिमंडळात सामील होण्यास स्वारस्य दाखविले नाही. एकंदरीतच आता उमर यांच्या मंत्रिमंडळात कोट्यातून काँग्रेसने मंत्री का दिला नाही, यावर आता चर्चा होत आहे. यामागे चार कारणे आहेत. जम्मू-काश्मीरच्या विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात काँग्रेसची सर्वात वाईट कामगिरी राहिली आहे. पक्षाला केवळ सहाच जागा मिळाल्या. अशावेळी काँग्रेसच्या श्रेष्ठींनी पक्षाच्या कोणत्याच नव्या आमदाराला मंत्रिपद न देऊन त्यांना आणखी मेहनत करण्याचा एकप्रकारे सल्लाच दिला आहे. काश्मीरमध्ये काँग्रेसच्या कोट्यातून एकही हिंदू आमदार निवडून आलेला नाही. परिणामी, पक्षाचे राजकीय समीकरण अचूक ठरलेले दिसत नाही. काश्मीरची मुस्लिम मते पीडीपी आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या बाजूने राहिलेली आहेत. उमर अब्दुल्ला आणि त्यांच्या पक्षाने कलम ३७० परत आणण्याची हमी दिली आहे. त्याचवेळी काँग्रेस केवळ स्टेटहूडची मागणी करत आहे. अशावेळी काँग्रेस सरकारमध्ये सामील झाले असते, तर अन्य राज्यांत त्यांची पीछेहाट होण्याची शक्यता राहिली असती. म्हणूनच त्यांनी सरकारमध्ये सामील न होण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांना केवळ सांकेतिक सहभाग नको होता.

श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

रक्तदान शिबिर , वृक्षारोपण, स्वछता अभियानात विद्यार्थ्यांचा सहभाग

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती- पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती या संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्रेयसदादा पोटे पाटील यांचा वाढदिवस महाविद्यालयात विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला यात रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, मतदार जनजागृती अभियान असे विविध कार्यक्रम पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती संयुक्त विद्यामानाने राबविण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष माननीय श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक वर्गाने आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवीत २५५ हून अधिक बाटलांचे संकलन केले यात संस्थेचे अध्यक्ष मा.आ. प्रवीण पोटे पाटील यांनी सुद्धा या शिबिरात स्वतः रक्तदान करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

या शिबिरात डॉक्टर पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय यांचे चमू डॉ. काकडे, डॉ पूजा खोटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्त संकलनाकरिता उपस्थित होती.त्याचप्रमाणे संस्थेचे उपाध्यक्ष माननीय श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान सुद्धा करण्यात आले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर जनजागृती कार्यक्रम आयोजित सुद्धा यावेळी केला.

यावेळी कार्यक्रमा प्रसंगी संस्थेचे संचालक , सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य , उपप्राचार्य, सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक वर्ग व रुग्णालयाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होतेशिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीधर मेंढे , प्रा धांडे , प्रा गंधक , प्रा तट्टे, प्रा मिश्रा, प्रा दुचक्के, प्रा. संदीप ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक देवेंद्र साबे, देवांग पेठे ,प्रतिक पेठे, अनिकेत कडू, हिमांशु लोखंडे, प्रज्वल सुने, सत्यजित आवारे, अथर्व नागापुरे, कुणाल गुजर, मनीष नेमाने, राज पाथरे, समीर देशमुख, तेजश डोहरे अमित कोहाड, मिलिंद मोरे, प्रथमेश पाचडे, गौरी रंधे, अनिश्का तायडे, प्राप्ती टीचुकले, गायत्री केने, गायत्री दाभाडे, क्षितिजा गोंड,राधिका गनोरकर, स्नेहा सावरकर, हर्षदा धांडे, प्रतिक तायडे या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले तसेच तृतीय वर्ष यंत्र अभियांत्रिकीची विद्यार्थिनी राधिका गणोरकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

मराठवाडा कृषि विद्यापीठाकडून देशी व अमेरिकन कापसाचे दोन वाण प्रसारित

दि.२२विदर्भ प्रजासत्ताक- केंद्रीय बियाणे अधिनियम, १९६६ नुसार भारत सरकारने केंद्रीय बियाणे समितीच्या शिफारसीनुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला.

याबाबत दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने अधिसुचना प्रसिध्द केली असुन राजपत्राचा नोंदणीकृत क्रमांक एसओ ४३८८ (अ) हा आहे. सदर पाच वाणात विद्यापीठ विकसित देशी कपासीचा पीए ८३३ व अमेरिकन कपासीचा एनएच ६७७ या वाणांचा समावेश आहे.

देशाच्या राजपत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिक वाणांचा समावेश केल्यामुळे या वाणांचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत होवून शेतकऱ्यांची

आर्थिक उन्नती साधता येईल असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि म्हणाले.

देशाच्या राजपत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिक वाणांचा समावेशामुळे सदरील वाणांचे बीजोत्पादन हे मुख्य बीजोत्पादन

साखळीमध्ये घेता येणार असल्याची माहिती संशोधन संचालक तथा मुख्य शास्त्रज्ञ डॉ. खिजर बेग यांनी दिली.

१) देशी कपासीचा पीए ८३३ वाण

- हा वाण विद्यापीठाच्या अखिल भारतीय समन्वयित कापूस सुधार प्रकल्पामार्फत विकसित करण्यात आला.
- या वाणाची उत्पादकता १५ ते १६ क्विंटल प्रति हेक्टर असून रुईचा उतारा ३५ ते ३६ टक्के आहे.
- धाग्याची लांबी २८ ते २९ मिलिमीटर आहे.
- १५० ते १६० दिवस कालावधी लागतो.
- या वाणाचा विशेष गुणधर्म म्हणजे सरळ धाग्याची लांबी व मजबुती.
- रस शोषक किडी, कडा करपा व दहिया रोगास सहनशील.
- पाण्याच्या ताणास देखील सहनशील.

२) अमेरिकन कपासीचा एनएच ६७७ वाण

- हा अमेरिकन कापसाचा वाण असून या वाणाची उत्पादकता १४ ते १५ क्विंटल प्रती हेक्टर असून रुईचा उतार ३७ ते ३८ टक्के आहे.
- धाग्याची लांबी २५ ते २६ मिलिमीटर.
- वाणाचा कालावधी १५५ ते १६० दिवस.
- पाण्याच्या ताणास व रस शोषक किडीस सहनशील.
- सधन पद्धतीने लागवडीस योग्य.

हाडं कमजोर झाली? पोकळ हाडांना कॅल्शियम देतात इवल्याश्या बिया; चमचाभर खा-निरोगी राहा

दि.२२विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य ९तीळ आरोग्यासाठी सुपरफूड मानले जाते. दिसायला छोट्या दिसणारे तीळ शरीराला बरेच फायदे देतात. पांढऱ्या तिळाचे सेवन हिवाळ्यात केले जाते. (क्षारश्रींह ढळीं) बदलत्या वातावरणात तिळाचा आहारात समावेश केल्यास केल्यास इम्यूनिटी मजबूत राहण्यास मदत होते आणि तुम्ही आजारी पडत नाहीत. शरीर गरम राहण्यास आणि हाडं मजबूत होण्यास मदत होते. सांधेदुखीच्या वेदनांपासूनही आराम मिळतो. तीळ गरम असतात थंडीच्या दिवसांत तिळाचे सेवन केल्यानं शरीर गरम राहतं.

तीळ खाल्ल्यानं हाडं मजबूत राहतात

तिळाला कॅल्शियमचा उत्तम स्त्रोत मानलं जाते. तीळ खाल्ल्यानं हाडं मजबूत राहतात. रोज २०० ग्राम पांढरे तिळ खाल्ल्यानं कॅल्शियमची गरज पूर्ण करता येते. यामुळे हाडांच्या वेदना दूर होतात आणि हाडं मजबूत बनतात. सांधेदुखीच्या वेदना दूर होण्यास मदत होते.

पांढरे तीळ खाल्ल्यानं शरीराला भरपूर एनर्जी मिळते. दिवसभरात जर तुम्ही १ मूठ तीळ खाल्ले तर आळस, कमजोरी, थकवा दूर होतो. शरीर एक्टिव्ह राहते आणि तुम्हाला फिट वाटते. थंडीत उद्भवणाऱ्या आजारांपासून दूर राहता येते. तिळाचे सेवन केल्यानं शरीरात गरमी टिकून राहते. शरीरात होणाऱ्या वेदना, सांधेदुखी, खोकला यांपासून सुटका मिळते. पांढरे तीळ खाल्ल्यानं कोलेस्टेरॉल लेव्हल नियंत्रणात राहते.

तिळाचे सेवन केल्यानं शरीरात उष्णता टिकून राहते. शरीरात होणाऱ्या वेदना, सांधेदुखी, सर्दीपासून आराम मिळतो. पांढरे तिळ खाल्ल्यानं कोलेस्टेरॉल लेव्हल कमी

होते आणि पचनक्रिया चांगली राहते. कॅल्शियम व्यतिरिक्त तिळात जिंक, कॉपर, मॅग्नेशियम आणि हेल्दी फॅट्स असतात.

तिळाचे सेवन कसे करावे?

हाडं मजबूत ठेवण्यासाठी तीळ दूधात घालून पिण्याचा सल्ला दिला जातो. यासाठी पांढरे तीळ तव्यावर भाजून घ्या. तीळ थंड झाल्यानंतर वाटून त्याची पावडर बनवा. तिळाची पावडर १ चमचाभर घ्या आणि दुधासोबत सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही वेळा प्या. यामुळे शरीर ताकदवान बनेल. दूध अधिक ताकदवान बनवण्यासाठी तुम्ही ड्राय फ्रुट्स् जसं की काजू, बदाम मिसळून पिऊ शकता. या पद्धतीनं रोज दूध प्यायल्यानं हाडं मजबूत होतात.

वंचितचे पश्चिम वऱ्हाडातील तीन उमेदवार जाहीर, मूर्तिजापूरमधून सुगत वाघमारे यांना संधी; पाचव्या यादीत १६ जागांचा समावेश

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अकोला : विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने आपली पाचवी यादी सोमवारी सायंकाळी जाहीर केली. यामध्ये १६ जागांवर उमेदवार देण्यात आले आहेत. पश्चिम वऱ्हाडातील मूर्तिजापूरसह तीन जागांचा समावेश आहे. मूर्तिजापूरमधून उद्योजक, बिल्डर सुगत वाघमारे यांना निवडणूक रिंगणात उतरवण्यात आले आहे.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्ष जोमाने कामाला लागले आहेत. लोकसभाप्रमाणे विधानसभा निवडणुकीत सुद्धा वंचित आघाडी स्वबळावर मैदानात उतरली आहे. महायुती व मविआमध्ये जागा वाटपावरून रस्सीखेच सुरू असतांनाच उमेदवार जाहीर करण्याच्या बाबतीत वंचितने आघाडी घेतली. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांच्या स्वाक्षरीने सोमवारी सायंकाळी उमेदवारांची पाचवी यादी जाहीर केली. या यादीमध्ये राज्यातील १६ विधानसभा मतदारसंघात उमेदवार देण्यात आले आहेत.अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघात सुगत वाघमारे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हा मतदारसंघ अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुगत वाघमारे यांची मूर्तिजापूर मतदारसंघात तयारी सुरू केली आहे. ड. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकली. गत विधानसभा निवडणुकीत मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार हरीश पिंपळे यांना वंचित आघाडीच्या उमेदवार प्रतिभा अवचार यांनी काटच्याची लढत दिली होती. अखेरच्या काही फेऱ्यांमध्ये पिंपळे यांनी निसटता विजय मिळवला होता. आता वंचित आघाडीने सुगत वाघमारे यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे.

तिजोरीत पैसे असूनही कापूस सोयाबीन अनुदान वाटप मंदावले! शेतकऱ्यांना का मिळेनात पैसे?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ मुंबई

राज्य सरकारने मागील हंगामातील म्हणजे २०२३ च्या खरिपातील कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना प्रतिहेक्टरी ५ हजार रूपयांचे अनुदान जाहीर केले होते. दोन हेक्टरच्या मर्यादेत सरकारने ३० सप्टेंबर रोजी या अनुदानाच्या वाटपाला सुरूवात केली. पहिल्याच टप्प्यात जवळपास ४९ लाख ५० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात २ हजार ३९८ कोटी रूपये वर्ग करण्यात आले होते. पण त्यानंतर अनुदान वाटपाची गती मंदावली आहे.

पहिल्या १० दिवसांत म्हणजे १० ऑक्टोबरपर्यंत राज्यातील ६७ लाख ६१ हजार खातेदारांना आणि ५७ लाख ६५ हजार शेतकऱ्यांना एकूण २ हजार ५६४ कोटी रूपयांचे वाटप झाले होते. पण त्यानंतरच्या १० दिवसांत म्हणजे २० ऑक्टोबरपर्यंत केवळ २५ कोटी रूपयांचा निधी वाटप करण्यात आला आहे. राज्य सरकारने अनुदानापोटी ४ हजार १९४ कोटी रूपये कृषी विभागाच्या खात्यावर जमा केले आहेत. पण या अनुदान वाटपाची गती आणि समंतीपत्रासाठीच्या अडचणी पाहता येणाऱ्या काळात हा पैसा शासनाच्याच खात्यात

पडून राहण्याची शक्यता आहे.

कापूस-सोयाबीनच्या अनुदानासाठी ९६ लाख पात्र खातेदार आहेत. त्यातील ८० लाख वैयक्तिक तर १६ लाख संयुक्त खाते आहेत. ८० लाख वैयक्तिक खात्यांपैकी ६४ लाख खातेदारांचे आधार संमतीपत्र कृषी विभागाला प्राप्त झाल्याची माहिती आहे. तर उर्वरित १६ लाख संयुक्त खातेदार आणि १७ लाख वैयक्तिक खातेदारांचे संमतीपत्र कृषी विभागाला मिळालेले नाहीत.

काय येतायेत अडचणी?

अनुदान वाटपासाठी अगोदर घातलेली ई-पीक पाहणीची अट सरकारने वगळली असली तरीही या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी खातेदारांनी कृषी सहाय्यकाकडे आधार समंतीपत्र देणे बंधनकारक आहे. पण अनेक खातेदार बाहेरगावी असल्यामुळे संमतीपत्र देऊ शकले नाहीत. तर संयुक्त खातेदारांतील एकमेकांच्या वादामुळे त्यांचेही समंतीपत्र आलेले नाहीत. संयुक्त खातेदारांपैकी एकाच खातेदारांच्या बँक खात्यात अनुदानाचे पैसे जमा केले जाणार आहेत. त्यामुळे सर्व खातेदारांनी सह्या करून कुणाच्या खात्यावर पैसे जमा करायचे आहेत हे ठरवून संमतीपत्र द्यायचे आहे. पण खातेदारांच्या एकमत होत नसल्यामुळे जवळपास ९५ टक्क्यांपेक्षा जास्त खातेदारांनी अजून संमतीपत्र दिलेले नाहीत.

आत्तापर्यंत एकूण वाटप (२१ ऑक्टो ची आकडेवारी)
खातेदार - ६७ लाख
रूपये वाटप - २ हजार ५८९ कोटी ७७ लाख रूपये

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २२ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण

विधानसभा निवडणुकीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

अमरावती, बडनेरा मतदारसंघाची पाहणी, सरमिसळनंतर मतदानयंत्र रवाना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मंगळवार, दि. २२ ऑक्टोबरपासून नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरूवात होणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कामाचा दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. तसेच सरमिसळ केल्यानंतर मतदानयंत्र संबंधित विधानसभा क्षेत्रात आजपासून पाठविण्यास सुरूवात करण्यात आली.जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात दोन हजार ७०८ मतदान केंद्र राहणार आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या मतदानयंत्राच्या २५ टक्के अधिक मतदान यंत्र उपलब्ध झाले आहे. मतदान यंत्राची प्रथमस्तरीय तपासणी केली आहे. ही मतदान यंत्रे स्ट्राँगरूममध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आले आहे. सरमिसळनंतर या मतदानयंत्रांचे विधानसभा मतदारसंघनिहाय वाटप आजपासून लोकशाही भवनातून सुरू करण्यात आले आहे. प्रत्येक मतदारसंघाला २० टक्के अधिक मतदानयंत्र वाटप करण्यात आले

आहे.दरम्यान आज जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी यांनी अमरावती आणि बडनेरा मतदारसंघाच्या नामनिर्देशन पत्र स्विकारण्यात येत असलेल्या कार्यालयाची पाहणी केली. अमरावती मतदारसंघासाठी तालुका प्रशासकीय भवनात नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची पाहणी केली. नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी येणाऱ्यांना योग्य त्या सुविधा देण्यात याव्यात. खर्च आणि परवानग्यांची योग्य माहिती देण्यात यावी. उमेदवारांना अर्ज, नमूने आणि आवश्यक त्या सूचना एकाचवेळी देण्यात याव्यात. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ पाच व्यक्तींनाच प्रवेश देण्यात यावा. परिसरात अनावश्यक गर्दी होऊ नये, यासाठी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देशही श्री. कटियार यांनी दिले.राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी प्रशासनाशी समन्वय ठेवावा. निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शी होणार आहे. त्यामुळे कोणतीही शंका आल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा. समस्यांबाबत अचूक माहिती घ्यावी, असे आवाहन श्री. कटियार यांनी केले.-

नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवाराने नियमांचे पालन करावे- जिल्हाधिकारी कटियार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती - भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून, दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आह नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस ताफ्यामध्ये तीन मोटारगाड्या, वाहने यांचा समावेश असावा. तसेच नामनिर्देशन दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्ती उपस्थित

राहतील. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, तसेच दालनात या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंध करण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश दि. २५ पर्यंत लागू राहणार आहेत.

अमरावती जिल्ह्यात ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध लागू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती- जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहिता कालावधीत निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या वाहनावरील ध्वनीक्षेपकामुळे ध्वनीप्रदूषण होते. परिणामी सामान्य नागरिकांच्या जीवनातील शांतता व स्वास्थ्यास बाधा पोहोचण्याची शक्यता असते. त्यामुळे भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार निवडणूक आयोगाने प्रतिबंध आणले आहेत. या नियमानुसार निवडणूक काळात जिल्ह्यात ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध घालण्यात आले असून, त्याविषयीचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी सौरभ कटियार यांनी निर्गमित केला आहे.भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा

वापर करून निवडणुका विना अडथळा व शांततेत पार पडण्यासाठी निवडणुकीच्या काळात ध्वनीक्षेपक वापरावर आयोगाने प्रतिबंध आणले आहेत. कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष कार्यकर्ते यांना ध्वनीक्षेपकाचा (लाऊडस्पिकरचा वापर) सक्षम पोलीस अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. फिरते वाहन रस्त्यावरुन धावत असताना त्यावरील ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. निवडणूक कालावधीत ध्वनीक्षेपकाचा वापर सकाळी ६ ते रात्री १० वाजेनंतर करता येणार नाही.हे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत अंमलात राहतील, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्री. कटियार यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

आचारसंहिता काळात शासकीय परिसरात मिरवणुका, घोषणा व सभा आयोजनास निर्बंध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा तसेच सभा घेण्यास निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी सौरभ कटियार यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश २३ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहणार आहेत. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी निवडणूक कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व मुक्त, न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसील कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणुकीसंदर्भातील पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्स लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, आवारात निवडणूकविषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे तसेच निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. निवडणूक कालावधी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अन्वये अमरावती जिल्ह्यामध्ये सर्वत्र शस्त्र वापरावर निर्बंध जाहीर आले आहेत. यानुसार निवडणूक

कार्यक्रम झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शस्त्र परवानाधारकास शस्त्र वाहून नेण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ सुधारणा कायदा भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत २३ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी श्री. कटियार यांनी दिले आहेत.

सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करण्यास निर्बंध

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्या कालावधीत सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष विद्रुपीकरण करण्यास निर्बंध घालण्याचे आदेश दिले आहेत.अमरावती जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी निर्बंध घालण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत लागू केले आहेत.

नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध, मोटार गाड्या, वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून, दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे.त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे या बाबीवर निर्बंध घालणे आवश्यक आहे. त्यासाठी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत.

मोटार गाड्या, वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंधभारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे.अमरावती जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी तीन पेक्षा अधिक मोटार गाड्या, वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.. त्यामुळे

जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये कोणत्याही वाहनाच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत निर्बंध घातल्याचे आदेश दिले आहेत.निवडणूक कालावधीमध्ये जात, धर्म, भाषावार शिबिरांच्या आयोजनास निर्बंधभारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. तसेच सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे सद्य परिस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक आहे.अमरावती जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीमध्ये कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धर्म, भाषावाद शिबिरांचे आयोजनावर निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हा दंडाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये दिले आहेत. हे आदेश दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत. धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्थांच्या जवळपासतात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निर्बंधभारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे.अमरावती जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्थांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्थांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत निर्बंध घातल्याचे आदेश दिले आहेत.

सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, रस्त्यावर निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स लावण्यास निर्बंध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती- भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे.अमरावती जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी, हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्पलेट्स, कटआऊट्स, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ

शकतो. तसेच अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत निर्बंध घातले आहेत. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे.अमरावती जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून सभा, मिरवणुका, निवडणूक प्रचार इत्यादी बाबी नियंत्रित करणे आवश्यक असल्याने जिल्हा दंडाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व शासकीय कार्यालये व विश्रामगृह या ठिकाणी सार्वजनिक व रस्त्यावर धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर घालण्याचे आदेश दिले आहेत.हे आदेश दि. २३ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनावर पक्ष प्रचाराचेकापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी निर्बंध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती- भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे.अमरावती जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून निवडणुकीच्या प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे

निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे, इत्यादी बाबींसाठी बंधन घालणे २०२३ चे कलम १६३ अन्वये पुढीलप्रमाणे आदेशाद्वारे निर्बंध घातले आहेत. यामध्ये फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही. तसेच तो त्या वाहनाच्या टपापासून २ फूट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

भाजपचेच पदाधिकारी म्हणतात अचलपूरचा उमेदवार बदला अन्यथा बंडखोरी अटळ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती-
भारतीय जनता पार्टीकडे अचलपूर विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी २० वर्षानंतर मिळाली, मात्र जो उमेदवार जिंकुण येऊ शकत नाही, तो उमेदवार दिल्याने समस्त जनता व भाजप कार्यकर्त्यामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. पक्षश्रेष्ठी व वरिष्ठांकडे यासंदर्भात चर्चा करुन स्थानिक व भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांला उमेदवारीची मागणी वारंवार केली होती, परंतु निष्ठावतांचे गाऱ्हाणे ऐकुन न घेता मतदारसंघाच्या बाहेरील उमेदवार घोषित केला. विधानसभा प्रमुख होण्याचा फायदा घेत त्यांनी स्वतःलाच नेत्यांसमोर प्रमोट केल्याचा आरोप करीत अचलपुरचा उमेदवार बदलून द्यावा अन्यथा बंडखोरी करु, असा ईशारा भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोहर सुने, प्रमोदसिंह गड्रेल, सुधीर रसे यांनी दिला.स्थानिक राजापेठ स्थित श्रमिक पत्रकार भवन येथे पत्रपरिषदेच्या माध्यमातून अचलपुर येथील भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बंडखोरीचा बिगुल वाजविला. पत्रपरिषदेमध्ये बोलतांना त्यांनी सांगितले की, २० वर्षानंतर भाजपाला या मतदारसंघात उमेदवारी मिळणार असल्याने भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ३ वर्षापासून जनतेमध्ये जाऊन त्यांच्याशी संपर्क साधला. विकास कामे, शासकीय योजना पोहोचविल्या. आम्ही फक्त मोठ्या नेत्यांसमोर स्वतःला प्रमोट केले नाही. कारण जनतेशीकाम असल्यामुळे नेहमी जनतेमध्ये राहून त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम केले. सहा महिन्यापासून जनतेमध्ये जाऊन जेव्हा चर्चा केली तेव्हा भाजपाचा उमेदवार निवडून येऊ शकतो, मात्र उमेदवार स्थानीक असावा, अशी मागणी असल्याने वरिष्ठ नेत्यांशी संपर्क करुन आमच्यापैकी कुणालाही उमेदवारी द्यावी. आम्ही तन-मन- धनाने काम करु, असे त्यांना आश्वस्त केले. मात्र अचलपूर मतदारसंघासाठी प्रवीण तायडे यांचे नाव घोषित झाले. तायडे यांचे नाव मतदारयादीत नसून त्यांचे मतदानसुध्दा मतदारसंघात नाही. जेव्हापासून राजकारण समजायला पक्षश्रेष्ठींनी अचलपुरचा उमेदवार बदलावा, अन्यथा बंडखोरीलागले तेव्हापासून आम्ही भाजपमध्ये आहोत, त्याउलट प्रवीण तायडे मुळचे भाजपचे कार्यकर्ते नाहीत. दूसऱ्या पक्षातून आलेले आहेत. अचलपूरसाठी ते एकप्रकारे आयात उमेदवार आहेत. अचलपूर येथील भाजप पक्ष कमकुवत करणे, गटबाजी तसेच कटकारस्थान करणाऱ्यालाच उमेदवारी देण्यात आल्याने त्यांच्याविरुध्द उद्रेक निर्माण झाला आहे. भाजपने निवडणुकीकरिता विधानसभा प्रमुखाकडेच यादी बनविण्याचे काम दिले होते, यासंदर्भात आम्हाला माहिती नव्हती यादी बनविण्याचे काम त्यांनीच केले. त्यामुळे त्यांना सर्वाधिक मत मिळाले. मात्र यादीमध्ये घोळ करण्यात आल्याने त्यांनी पदाचा गैरवापर केला. वरिष्ठांनी आमच्या मागणीची दखल घेतली नाही, याची खंत नेहमी राहणार, मात्र अजूनही वेळ गेलेली नाही. उमेदवार बदलून द्यावा. याकरिता वरिष्ठांकडे मागणी केली आहे. अन्यथा प्रमोदसिंह गड्रेल, मनोहर सुने, सुधीर रसे हे तीन उमेदवार बंडखोरी करीत अपक्ष अर्ज दाखल करतील. त्यापैकी एक उमेदवार निवडणुकीत उतरणारच असा इशारा यावेळी देण्यात आला. पत्रकार परिषदेमध्ये प्रमोदसिंह गड्रेल, सुधीर रसे, मनोहर सुने, गोपाल तिरमारे, अक्षरा लहाने, डॉ. राजेश उभाड, नंदु वासनकर, अभय माथने, प्रसन्ना काठोळे, मयूर खापरे, सुमीत निंभोरकर, विलास दामोधर, माधव अवघड, अतुल दारोकार, राजू तंतरपाळे उपस्थित होते.

नांदगाव खंडेश्वर येथे सोयाबीनला हमीभाव न मिळाल्यामुळे एक तास रास्ता रोको

शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी केली सरकार विरोधात प्रचंड नारेबाजी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२नांदगाव खंडेश्वर-
नांदगाव खेंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार समीतीमध्ये शेकडो शेतकऱ्यांनि सोयाबीन विक्रीस आणले होते बाजार समितीत सोयाबीन खरेदी सुरू असतांना बाजार समिती मधील व्यापाऱ्यांनी शासनाच्या हमी भावा पेक्षा कमी दराने खरेदी करीत होते शासनाचे हमीभाव ४८९२ रुपये असतांना व्यापारी ३१८० रुपये २५१० रुपये ३३०० रुपये प्रति क्विंटल दराने कवडीमोल भावात खरेदी करीत असल्याने शेतकऱ्यांनि खरेदी बंद पाडून शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात एक तास रास्ता रोको केला आणि तद्नंतर पाच तास बाजार समिती मध्ये ठिय्या आंदोलन करून संपूर्ण खरेदी विक्रीचा व्यवहार बंद पाडून बाजार समितीचे सचिव यांनी संबंधित व्यापाऱ्यांनवर बाजार समितीचे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व आज झालेला हरास रद्द करून बाजार समिती बंद करण्याचे लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.-

गुन्हे शाखेने बडनेरात पकडला २८ किलो गांजा; दोघांना अटक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती १८
शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने रविवारी (दि. २०) रात्री बडनेरा येथील गांधी विद्यालयाजवळ दोन आरोपींना गांजासह पकडले. या वेळी पोलिसांनी ५ लाख ७४ हजार २०० रुपये किमतीचा २८ किलो गांजा जप्त केला आहे. विशेष म्हणजे गुन्हे शाखा पोलिसांनी यापूर्वीही अनेकदा बडनेरात गांजा पकडला आहे. मात्र स्थानिक बडनेरा पोलिसांना गांजाबाबत माहिती मिळत नाही का, अशी चर्चा या कारवाईनंतर सुरू झाली आहे.

मो. अवेस वल्द मो. आरिफ (२२, रा. टेकडीपुरा, वॉर्ड नं. ६, मंगरूळपीर, जि. वाशीम, ह.मु. खदान नाका, मुलानी चौक, अकोला) व इम्रान खान वल्द नवाज खान (३०, रा. लालखडी, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून गांजा व इतर साहित्य असा एकुण ५ लाख ७४ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोन्ही आरोपींविरुद्ध बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार, विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलिस शहरातील सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई तसेच अंमली पदार्थ विक्री व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी २० ऑक्टोबरला गस्त घालत होते. त्याचदरम्यान गुप्त माहिती मिळाली की, दोन व्यक्ती बडनेरा रेल्वे स्टेशनकडून गांधी विद्यालयाकडे चार बॅग गांजा घेऊन जात आहेत. या माहितीवरून गुन्हे शाखा युनिट क्रमांक दोनच्या पथकाने सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांनी स्वत:चे नाव मो. अवेस वल्द मो. आरिफ व इम्रान खान वल्द नवाज खान असे नावे सांगितले. पोलिसांनी त्यांच्याजवळील बॅगची तपासणी केली असता, त्यामध्ये गांजा आढळून आला. त्यानंतर त्यांना बडनेरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार, सपोनि महेश इंगाले, योगेश इंगळे व त्यांच्या पथकाने केली आहे.

बडनेराच्या डीबी पथकाला माहिती मिळत नाही बडनेरा ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शाखेने यापूर्वीही बरेचदा गांजा पकडला आहे. गुन्हे शाखेचे पथक अमरावतीतून जाऊन बडनेरात कारवाई करतात. मात्र बडनेरा पोलिसांना गांजाबाबत माहिती मिळत नाही, ही बाब आश्चर्यकारक आहे. वास्तविक बडनेरा ठाण्यात स्वतंत्र गुन्हे शोध पथक आहे. मात्र त्यांनाही गांजाबाबत माहिती होत नाही. याबाबत वरिष्ठ निश्चितच आता बडनेरा पोलिसांना विचारणा करण्याची शक्यता आहे.

हिंगोली जिल्ह्यात भुकंपाचा सौम्य धक्का: केंद्रबिंदू नांदेडमध्ये

सकाळी ६.५२ वाजता ३.८ रिश्टर स्केलची नोंद, भीतीमुळे नागरिक घराबाहेर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ हिंगोली-
जिल्ह्यातील वसमत, कळमनुरी तालुक्यातील काही गावांना मंगळवारी ता. २२ सकाळी ६.५२मिनीटांनी भूकंपाचा धक्का जाणवला असून यामुळे नागरीकांमधून भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भूकंपाचे केंद्रबिंदू नांदेड असून त्या ठिकाणी ३.८ रिश्टर स्केलची नोंद झाल्याचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या सुत्रांनी सांगितले.

हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षात भूकंपाच्या धक्यांमधून वाढ झाली आहे. २ रिश्टर स्केल पासून ते ३.८ रिश्टर स्केल पर्यंतचे भूकंप झाले आहेत. यापुर्वी रामेश्वरतांडा (ता. कळमनुरी) केंद्रबिंदू असलेल्या ठिकाणी ३.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. त्यामुळे संपूर्ण हिंगोली जिल्हा

हादरून गेला होता.

त्यानंतर आज सकाळी ६ वाजून ५२मिनीटांनी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. वसमत व कळमनुरी तालुक्यातील काही गावांमधून हे धक्के जाणवले असून पहाटेच्या या भूकंपामुळे नागरीकांमधून भितीचे वातावरण निर्माण झाले. या भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड असून त्या ठिकाणी ३.८ रिश्टर स्केलची नोंद झाल्याचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या सुत्रांनी सांगितले. मात्र भूकंपामुळे कुठेही हानी झाली नसल्याचे सांगण्यात आले आहे.दरम्यान, हिंगोली जिल्हयात वारंवार होणाऱ्या भूकंपाबाबत माहिती घेण्यासाठी केंद्राचे पथक सुमारे चार महिन्यापूर्वी हिंगोली जिल्हयात सर्वेक्षण करून गेले होते. त्यांनी रामेश्वरतांडा सह परिसरातील गावांमधून तसेच वसमत तालुक्यातील काही गावांमध्ये भेट देऊन पाहणी केली तसेच काही गावकऱ्यांशी संवाद साधला आहे. मात्र या बाबतचा अहवाल अद्यापही जिल्हा प्रशासनाकडे सादर झाला नाही. त्यामुळे हिंगोली जिल्हयाला या अहवालाची प्रतिक्षा लागली आहे.

बाल सुधारगृहातून सुटलेल्या मुलाचा खून

दोन-तीन महिन्यापूर्वी झाला होता वाद

घटना सोमवारी (ता. २१) रात्री ८ वाजताच्या सुमारास उघडकीस



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती- बाल सुधार गृहातून नुकत्याच सुटलेल्या मुलाचा खून करून त्याचामृतदेह गडगडेश्वर मंदिरामागे फेकल्याची घटना सोमवारी (ता. २१) रात्री ८ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. पोलिसांनीमृतदेह गडगडेश्वर मंदिरामागे फेकल्याची आली. पोलिसांनी

घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह वैद्यकीय परिक्षणाकरिता पाठविला. साहिल मनीष चोपडा (पंजाबी) वय १७ रा. गडगडेश्वर परिसर) असे मृताचे नाव आहे.खोलापुरीगेट ठाण्यांतर्गत येणाऱ्या गडगडेश्वर मंदिरामागे एका युवकाचा खुन झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांचा ताफा व सर्व पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच परिसराची पाहणी केली असता मंदिरामागे रक्ताच्या थारोळ्यात साहिलचा मृतदेह दिसला. पोलिसांनी परिसराची पाहणी केली असता मृतदेहालगतच आढळलेला रक्ताने माखलेला चाकू पोलिसांनी जप्त केला. साहिलचा कोणी खुन केला याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

कलर बॉक्सदोन-तीन महिन्यापूर्वी झाला होता वाद

साहिल पंजाबी व यादव यांच्यात २ ते ३ महिन्यापूर्वी काही कारणावरून वाद झाला होता. दोन्ही गटातील युवकांनी आपसी वाद मिटविण्याकरिता राजापेठ ठाण्याच्या हद्दीत एक मिंटीग घेतली होती. परंतु त्यावेळी आपसातच त्याच्यात वाद झाले आणि साहिलने यादववर चाकूने वार केला होता. तेव्हापासून त्यांच्यात वैर होते.

नुकतीच झाली होती सुटका

यादववर चाकूने वार केल्याप्रकरणी राजापेठ पोलिसांनी प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करून साहिल याला ताब्यात घेऊन बाल सुधारगृहात ठेवले होते. त्यानंतर साहिल नुकताच बाल सुधारगृहातून सुटला आणि सोमवारी त्याचा खुन झाला. पोलीस यादव यांच्या शोधात आहेत.-

लक्ष्मीपूजनासाठी बाजारात लक्ष्मीच्या मूर्ती, दिवे विक्रीला:, चांदीच्या मूर्तींना नागरिकांची पसंती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती-
अमावास्येच्या अंधारातून प्रतिपदेच्या प्रकाशात जाणारा दिवाळी हा सण आहे. आश्विन शुद्ध द्वादशी म्हणजेच वसू बारसपासून या सणाला प्रारंभ होतो, कार्तिक शुद्ध द्वितीया म्हणजे भाऊबीजेला सांगता होते. दरम्यान लक्ष्मीपूजनासाठी बाजारात अनेकविध आकारातील आकर्षक लक्ष्मी मूर्ती विक्रीस आल्या असून, यंदा २५ टक्क्यांनी भाव वधारले आहेत. शहरातील बाजारात आकारानुसार १५० रुपयांपासून ते ३ हजार रुपयांपर्यंत विक्रीला आल्या आहेत. दारिद्र्याचा अंधार दूर सारून समृद्धीचा दीप चेतवण्याचा संदेश दिवाळी देते. आश्विन कृष्ण अमावास्या हा दिवस लक्ष्मीपूजन म्हणून साजरा होतो. दिवाळीचे दिवस म्हणजे सुगीचे दिवस. पावसाळा संपून शेतात पिके डोलतात. सर्वत्र आनंद, उत्साहाचे वातावरण असते. भारतीय संस्कृतीत लक्ष्मी ही समृद्धी-संपदेची देवता मानली जाते. दारिद्र्य दूर होण्यासाठी लक्ष्मीची पूजा करण्यात येते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मी कुबेर यांची पूजा केली जाते. सामान्यत: लक्ष्मीपूजन सायंकाळी वा रात्रीच्या वेळी करण्याची प्रथा आहे. त्यासाठी घरोघरी दिवाळीत मातीच्या लक्ष्मी मूर्तींची खरेदी होते. अलीकडे मातीऐवजी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या लक्ष्मीची मूर्ती विक्रीस येत आहेत. एकीकडे विधानसभा निवडणुकीची

धामधूम तर दुसरीकडे शहरातील बाजारात खास दिवाळी साहित्याची रेलचेल वाढली आहे. शहरातील जयस्तंभ चौक, इतवारा बाजार, जवाहर गेट, नवाते, गाडगे नगर चौक, नमुना गल्ली परिसर, राजापेठ, गांधी चौक, मोची गल्ली, अंबादेवी मंदिर परिसर मार्ग आदी ठिकाणी दिवाळी साहित्याचा बाजार सजला आहे. त्यामध्ये लक्ष्मी मूर्तीचा समावेश आहे. शहरासह आसपासच्या ग्रामीण भागातील विक्रेते शहरातील विविध भागात दाखल झाले असून, त्यांनी रस्त्याच्या कडेला दुकाने सजवली आहेत. मागील काही वर्षांपासून राजस्थान तसेच पश्चिम बंगाल राज्यातील कारागीरही अमरावती शहरात दिवे, मूर्तींची विक्री करतात. मागील वर्षी साधारणपणे १०१ रुपयांना मिळणारी लक्ष्मी मूर्ती यंदा १५० रुपयांवर पोहोचली आहे.

मूर्तींच्या सजावटीवर अधिक भरलक्ष्मीपूजनासाठी बाजारात दाखल झालेल्या लक्ष्मी मूर्तींच्या सजावटीवर अधिक भर दिसून येतो. पूर्वी मातीची एकच साचेबद्ध डोक्यावर दिवे असलेली मूर्ती बाजारात दिसायची. आता मात्र मूर्तींमध्ये वैविध्य दिसून येते. यामध्ये कमळारूढ, सिंहासनस्थ, उभी अशा लक्ष्मी मूर्ती दिसतात. त्यासोबतच मूर्तीवर सजावट कामावर भर देण्यात येतो. लक्ष्मीच्या डोक्याला गंगावण, डोक्याला बिंदी, कानातले, नाकातले खरोखरचे दागिने, साडीवर टिकल्या, जरी लावून केलेले काम अशा मूर्ती विक्रीस असून, त्यांची किंमत अधिक आहे. मात्र, आकर्षक असल्याने त्यांना मागणीही चांगली आहे.

परीक्षेच्या तारखांची पुढील आठवड्यात घोषणा

बारावीची ३० ऑक्टोबरपर्यंत तर दहावीची १० नोव्हेंबरपर्यंत अर्जाची मुदत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ अमरावती

पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षांचे अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. बारावीसाठी ३० ऑक्टोबर तर दहावीसाठी १० नोव्हेंबर ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे.

शाळा आणि महाविद्यालयांच्या माध्यमातून हे अर्ज भरुन घेतले जात आहेत. त्यामुळे सध्या प्रत्येक शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध विषयांच्या असाइनमेंटस् चे अहवाल सादर करण्यासोबतच परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेने स्वतंत्र वेळापत्रक तयार करुन दिले असून त्यानुसार त्या-त्या शाळा महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना योग्य त्या सूचना निर्गमित केल्या आहेत. वर उल्लेखीत दोन्ही तारखा ह्या विना विलंब शुल्काशिवायच्या आहेत. परंतु जे विद्यार्थी या वेळांमध्ये परीक्षा अर्ज भरु शकणार नाहीत, त्यांना विलंब शुल्कासह अर्ज भरुन देण्याची मुभा देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अमरावती विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र हे पश्चिम विदर्भाच्या पाचही जिल्ह्यात व्यापले आहे. त्यामुळे अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम व यवतमाळ या पाचही जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालये आणि दहावीच्या सर्व शाळांना मंडळातर्फे योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. दहावी, बारावीचे परीक्षा अर्ज ऑनलाईन भरावयाचे आहेत. परंतु त्यासाठी त्या-त्या जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांचे प्रशासन विद्यार्थ्यांना मदत करीत आहे. किंबहूना त्यासाठी स्वतंत्र कक्ष उघडण्यात आले असून त्याठिकाणी पूर्णवेळ शिक्षक, प्राध्यापकांची नियुक्तीही करण्यात आली आहे.

परीक्षेच्या तारखांची पुढील आठवड्यात घोषणा

दहावी-बारावीचे परीक्षा अर्ज दाखल करण्यासंदर्भात दुजोरा देत असतानाच विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष निलीमा टाके यांनी आगामी आठवड्यात या दोन्ही परीक्षांचे वेळापत्रक घोषित होण्याची शक्यता वर्तविली आहे. पुण्यातील शिखर मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षांच्या संभाव्य तारखा यापूर्वीच घोषित केल्या असून त्यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. राज्यभरातून अशा अनेक सूचना व हरकती शिक्षण मंडळाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार शिखर मंडळ लवकरच परीक्षांचे वेळापत्रक घोषित करेल, असे टाके यांचे म्हणणे आहे.

सण आठवडाभरावर तयार फराळाकडे महिलांचा कल

दिवाळी फराळ तयार करण्यासाठी वाढली लगबग

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

दिवाळी आली की, घराघरांमधून खमंग वास दरवळतो. दिवाळीचा फराळ आता स्वयंपाक घरात तर बनतोच, शिवाय आचाऱ्यांनासुद्धा फराळ तयार करण्याचे काम दिले जाऊ लागले आहे. दिवाळीचा शक्य तेवढा फराळ घरी तयार करणे तर शेव, लाडू, शंकरपाळे, बालुशाही, लाडू यासारखे विविध पदार्थ आचाऱ्यांकडून बनवून घेणे आता महिलांसाठी सोयीचे झाले आहे.

काही फराळ दुकानातून किंवा रेडिमेड बनवून घेणे तसेच आचाऱ्यांकडून बनवून घेण्याला महिलांकडून पसंती दिली जात आहे. फराळासाठी लागणारे सर्व साहित्य बाजारातून विकत आणून फराळ तयार करून घेण्यासाठी कारागिराला किलोप्रमाणे पैसे मोजले जात आहेत. सध्या दिवाळीसाठी लगबग सुरू झाली आहे.

रंगरंगोटीसह नवीन वस्तू खरेदीवर भर

वर्षभरातील महत्त्वपूर्ण मानला जाणारा दिवाळी सण मंगळवार, २९ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. असे असले तरीही आतापासूनच दिवाळीनिमित्त घराच्या रंगरंगोटीसह सजावट करण्यासाठी लगबग वाढली आहे. दिवाळी सणासाठी विविध साहित्यांनी बाजारपेठाही बहरल्या आहेत. ग्राहकही आकर्षित होत असून, खरेदीसाठीही उत्साह दिसून येत आहे. किराणा सामान, फटाके, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपडे, मिठाई, फुलांचे तोरण व माळ, विविध प्रकारचे दिवे, लायटिंग, आकाश कंदील, मातीच्या पणत्या, गृहोपयोगी वस्तू तसेच घर सजावटीसह सुखचैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी बाजारपेठेत हळूहळू गर्दी करण्यास सुरुवात केली आहे.

शहरासह ग्रामीण भागातही फराळ तयार करणाऱ्या आचाऱ्यांना बोलावून आपल्या पसंतीचे फराळाचे पदार्थ बनविण्यात येत आहेत. दीपोत्सव अवघ्या आठवडाभरावर येऊन ठेपला आहे.दिवाळी जसजशी जवळ येऊ लागली आहे, तसतशी महिलांची फराळ तयार करण्याची लगबग वाढू लागली आहे.

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर सध्या घरगुती फराळाचे पदार्थ बनविणे सुरू झाले आहे. त्यात महिलांचा उत्साह दिसून येत आहे. मात्र, धावपळीच्या युगात व नोकरी करणाऱ्या महिलांना घरी फराळ तयार करण्यास पुरेसा वेळ मिळत नसल्याने आचाऱ्यांकडून फराळ तयार करून घेण्यावर आता भर दिला जात असल्याचे दिसून येत आहे.

राज्यातील ४१ महिला व पुरुष ग्रामगीताचार्य पदवीने सन्मानित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२गुरुकुंज आश्रम

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम अंतर्गत श्रीगुरुदेव ग्रामगीताजीवन विकास परीक्षा विभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या सन २०२४-२०२५ या वर्षात घेतलेल्याग्रामगीताचार्य या परीक्षेत पदवी प्राप्त करणाऱ्या एकूण ४१ महिला व पुरुषांना राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवात ग्रामगीताचार्य ही पदवी देऊन त्यांना प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. या पदवीधारकांना ग्रामगीताचार्याची पदवी, सुवर्णपदक व स्मृतिचिन्हदेऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय श्रीगुरुदेवसेवामंडळाचे संचालक मंडळाच्या अध्यक्षा सौ. पुष्पा बोंडे ह्या होत्या तर उद्घाटक सेवामंडळाचेसर्वाधिकारी लक्ष्मण गमे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून विजयादेवी (भीलवाडा), स्वाध्वी भगवतदासत्यागी, प्रचार प्रमुख प्रकाश वाघ, परीक्षा विभागाचे अध्यक्ष गुलाब खवसे, महादेव राघोर्ते, बाबारावपाटील, ॲड.

दिलीप कोहळे, दिलीप गावंडे, पी.पी. पाळेकर, सुर्यप्रकाश जयस्वाल, रामदास देशमुख,काशिनाथ फुटाणे, विठ्ठल उमप, पौर्णिमाताई सवाई, राधेश्याम निमजे, शोभाताई कऊटकर, विजयाताईदहेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला पुष्पा बोंडे, प्रकाश वाघ, लक्ष्मण गमे यांनीमार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ताराचंद कंठाळे यांनी केले. संचालन ग्रामगीता विभागाचेसचिव गोपाल कडू यांनी तर आभार प्रदर्शन पौर्णिमाताई सवाई यांनी केले. सर्वश्री नंदकिशोर लोखंडे,डॉ. मोहनदास गाडबैल, शुभांगी कुतरमारे, नरेंद्र गौतम, मनोहर वडीचार, सुधाकर पिसे, चेतन ठाकरे,भगवान मंडलवार, उल्हास इटनकर, डॉ. अनंत हजारे, मंदा कउटकर, श्रीनिवास खाडे, ओंकार पाटील,भावेश झलके, रमेश तावाडे, राजेंद्र जिकार, पंडीत तट्टे, नंदकिशोर अकर्ते, ज्ञानेश्वर टाले, संतोष वर्भे,किसनराव बरडे, विनोद दंडारे, वासुदेव ठाकरे, शुभांगी जुवार, अनिता डोंगोरे, प्रणाली उमप, कु. इंदिराडोंगरे, दीपा सुपले, रेखा राऊत, डॉ. मिना गावंडे, डॉ. शोभा गायकवाड, ॲड. स्मीता बुल, कु. अलकारेवतकर, श्रीमती रजनी बेलुरकर, कु. तेजस्वनी मानमोडे, कु. जागृती ठोसर, कु. तेजस्वनी डंबारे, श्रीमतीशितल येरपुडे, कंदिला आखरे, लता चर्जन, कु. जया गावंडे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ग्रामगीताचार्यपदवी देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले.

धोरणात ठोस निर्णय घेण्याच्या दृष्टीने आ. सौ.सुलभाताई खोडकेंनी केले नागरिकांच्या सूचनांचे संकलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

जनतेनी वेळोवेळी केलेले सहकार्य,दिलेली अखंडितपणे साथ,आपुलकी-जिव्हाळा याबद्दल आभारी असण्याचे दुसरे नाव कृतज्ञता आहे.ही सकारात्मक आणि सर्जनशील शक्ती आपणाला क्षणोक्षणी प्रेरणादायी व उर्जादायी ठरली आहे.शेतकऱ्यांचे प्रश्न,कामगारांचे हक्क,महिला सशक्तीकरण यावर लक्ष केंद्रित करून सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नरत राहू.निवडणूक हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. जनतेने मतदानाच्या प्रक्रियेबद्दल जागरूक राहणे आवश्यक आहे. नागरिकांना सुलभ,सुरक्षित आणि विस्तारित सुविधा मिळाल्या पाहिजे.याला आपले सर्वतोपरी प्राधान्य आहे.अमरावती शहरात पायाभूत सुविधांची उपलब्धी तरुणांना रोजगार व स्वावलंबन मिळावे म्हणून उद्योग निर्मितीचा आग्रह धरून सर्वांगीण विकासासाठी सर्वप्रथम आपण शासनदरबारी आवाज उठवला आहे.आव्हानात्मक काम करताना संयम बाळगीत

सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा इंजिनिअरिंग आणि क्लाउड टेक्नॉलॉजीमधील कौशल्याची मागणी लक्षात घेता आयटी आणि सेवा क्षेत्रात स्थानिक युवक-युवतींना संधी उपलब्ध व्हावी याकरिता आपण विधिमंडळात सभागृहात मागणीही केली.आपण धावत्या जगात आणि स्पर्धेच्या युगात वावरत आहोत याची सतत जाणीव ठेवून मार्गक्रमण करीत असताना शब्दांची सहानुभूती कामाची नसून कृतीतून सत्यता दिसून आली पाहिजे.यावर सातत्याने भर दिला आहे.जनआशीर्वाद पदयात्रेच्या निमित्ताने नागरिकांशी संपर्क व संवाद साधून कल्पनाशक्तीला वाव मिळतो, सर्जनशीलतेत वाढ होते.'संवैधानिक भारत घडविणे हेच आपले ध्येय व उद्दिष्ट असले पाहिजे. याकरिता प्रत्येक नागरिकांनी आगामी २० नोव्हेंबर २०२४ रोजी आवर्जून आपल्या मतदानाचा हक्क बजावीत मला जनसेवेची संधी द्यावी.अशी विनंती करत आमदार-सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी पुंडलिकबाबा नगर-राममोहन नगर येथील नागरिकांना विनम्रतापूर्वक आवाहन केले. समताधिष्ठित मूल्ये,स्त्री-पुरुष समानता जपण्यासाठी आपण सदैव तत्पर व कटिबद्ध आहोत.या शब्दात आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांनी संवाद साधून यावेळी पदमसौरभ कॉलोनी-प्रिया टाऊनशिप येथर जनता-जनार्धनाचे आशिर्वाद घेतले.माणसाच्या आधुनिक प्रगतीसाठी व सुखसोयीसाठी विकास होणे आवश्यक असले तरी हा विकास ' पर्यावरणपूरक विकास 'आणि पर्यावरण आरोग्यवर्धक असायला हवा याची काळजी घेणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेता, शहरातील विविध भागात उद्याने विकसित करणे यावर आपला भर आहे.अशी भूमिका व्यक्त करीत आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांनी यावेळी गृहभेटीतून स्थानिकांशी संवाद साधला.जनतेनी वेळोवेळी दिलेली भरभक्कम साथ तसेच आपुलकीचे बळावर आपण विकासकामांना गती देऊ शकलो.आगामी काळात विविध प्रकारच्या विकासकामांची पूर्तता करण्यासाठी येत्या २० नोव्हेंबर -२०२४ रोजी जनतेनी आपला बहुमुल्य आशिर्वाद देऊन मला मतदान करावे, या आशिर्वाद पदयात्रे दरम्यान आमदार- सौ.सुलभाताई खोडकेंनी स्थानिकांना विनंती केली.शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन आणि शाश्वत स्वच्छतेवर आपला भर आहे.यादरम्यान आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांचेशी प्रत्येक साधकबाधक आवश्यकतेवर सखोल विचारविनिमय व चर्चा केल्यानंतर त्यांनी दिलेला शब्द सार्थ ठरवीत समस्या मार्गी लावण्यासाठी केलेले प्रयत्न व अंमलबजावणी करण्यासाठी घेतलेला पुढाकार लक्षात घेता आम्ही सदैव आपणासोबतच आहोत.यावेळी असा विश्वास स्थानिकांनी व्यक्त केला. या आशीर्वाद पदयात्रेत पुंडलिकबाबा नगर,एकविरा विद्युत कॉलनी,विद्युत तांत्रिक कॉलनी,सुरभि विहार,गोपी कॉलोनी,के.पी.कॉलनी,राममोहन नगर,अयोध्या कॉलोनी, पटवारी कॉलोनी,तिरुमला कॉलोनी,स्नेहा कॉलोनी,प्रिया टाऊनशिप,पूर्वा टाऊनशिप, पदमसौरभ कॉलोनी,संमती कॉलोनी,सोनल कॉलोनी, व्ही.आय.पी.कॉलोनी,अयोध्या कॉलोनी,पटवारी कॉलोनी, तिरुमला कॉलोनी, स्नेहा कॉलोनी,प्रिया टाऊनशिप येथील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी व युवक बांधव प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्ह्यात २६०० पैकी केवळ ३७५ शाळांतच कॅमेरा शासन आदेशाची अंमलबजावणी नाहीच

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

बदलापूर येथील शाळेत अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारानंतर संपूर्ण राज्य हादरले. त्यानंतर राज्याच्या शिक्षण विभागाने तत्काळ सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविण्याचा आदेश जारी केला. परंतु, जिल्ह्यातील २ हजार ६०० शाळांपैकी केवळ ३७५ शाळांमध्ये आजपर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. मात्र, अद्याप २ हजार २२५ शाळा सीसीटीव्ही

कॅमेऱ्यांच्या नजरेआड असल्याचे वास्तव आहे.

जिल्हाभरात २ हजार ६०० शाळांपैकी केवळ ३७५ शाळांमध्येच सीसीटीव्ही लागले आहेत. त्याचप्रमाणेमहापालिकेच्या ६४ पैकी १४ शाळांमध्येच सीसीटीव्ही आहेत. शहर व जिल्ह्यातील बहुतांश खासगी शाळांमध्येच सीसीटीव्ही असल्याने जिल्ह्यातील शासकीय शाळांमधील सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या १ हजार ५८६ शाळांपैकी केवळ १९ शाळांतच सीसीटीव्ही कॅमेरे लागले आहेत. मात्र, उर्वरित शाळांमध्ये सीसीटीव्ही केव्हा लागणार, याचा प्रश्न अद्याप कायम आहे.

सीसीटीव्हीसाठी प्राधान्यक्रम ठरविला

सीसीटीव्हीसाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने प्राधान्यक्रम ठरविला असून, ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे. तसेच ज्या शाळांमध्ये ३५ पेक्षा जास्त विद्यार्थिनी आहेत, अशा शाळांकडून माहिती मागविली आहे. ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही नसतील, तेथे प्राधान्याने सीसीटीव्ही बसविले जाणार आहेत, अशी माहिती जि. प. शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

डीपीसीकडे निधीसाठी प्रस्ताव

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागांना शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी जिल्हा नियोजनसमितीकडे सुमारे ३ कोटी रु. निधीसाठी प्रस्ताव दिला आहे. मात्र, या प्रस्तावावर अद्याप शिक्कामोर्तब झाले नाही.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात हॉटेल, बार, दारू दुकाने रात्री ११ नंतर बंद; आदेश जारी

विदर्भ प्रजासत्ताक दि.२२कोल्हापूर

विधानसभा निवडणुकीमुळे आज, मंगळवार (दि. २१ ऑक्टोबर) पासून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात येईपर्यंत कोल्हापूर जिल्हा कार्यक्षेत्रातील सर्व हॉटेल, धाबे, रेस्टॉरंट, बार, परमिट रूम, देशी, विदेशी दारू दुकाने रात्री ११ नंतर बंद करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने सोमवारी जारी केले. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती फौजदारी कारवाईस पात्र राहतील, असे त्यात म्हटले आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून निवडणुका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी संजय तेली यांनी भारतीय नागरिक

सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये हे आदेश लागू केले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या आंतरजिल्हा व कर्नाटकमधील बेळगाव या आंतरराज्य नाक्यांवर पोलिस व राज्य उत्पादन शुल्कचे संयुक्त पथक तपासणीसाठी सज्ज असणार आहे. मंगळवारी वरील पाच जिल्हे व कर्नाटक प्रशासनाची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

२९ तारखेला आमदार रवी राणा बबलू देशमुख उमेदवारी अर्ज भरणार

महायुतीचा मला पाठिंबा-रवी राणा यांचा दावा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

बडनेरा मतदार संघातून सलग तीन वेळा निवडून आलेले युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा हे पुन्हा चौथ्यांदा युवा स्वाभिमान संघटनेकडून निवडणूक रिंगणात उतरणार आहे, २९ तारखेला युवा स्वाभिमान पक्षाचे वतीने रवी राणा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे, तर मला महायुतीचा पाठिंबा आहे असा दावा रवी राणा यांनी केला,मी पाच वर्षे जनतेत असतो जनता जनार्दन माझे माय बाप आहे त्यांच्यावर माझा विश्वास आहे, मी पाच वर्षे काम करतो असं रवी राणा यांनी सांगितले तर अचलपुर विधानसभा मतदार संघाचे कांग्रेसपक्षाचे उमेदवार बब्लू देशमुख हे २९ तारखेला आपला उमेदवारी अर्ज दखल करणार आहेत.आज मंगळवार, दि. २२ ऑक्टोबरपासून नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरूवात ज़ली आहे त्यानुसार बडनेरा विधानसभाप्राप्त नामनिर्देशन निरंकनामनिर्देशन विक्री२८ व्यक्ती४३ फॉर्म नेले. दर्यापूर विधानसभा१. प्राप्त नामनिर्देशन -निरंक२. नामनिर्देशन विक्री - २५व्यक्ती ४४ फॉर्म नेले. ३६

धामणगांव रेल्वे- आज दि २२ ऑक्टोबर रोजीप्राप्त नामनिर्देशन निरंकनामनिर्देशन विक्री १४व्यक्ती ३८ फॉर्म नेले. आज दि २२ ऑक्टोबर रोजी०३९ तिवसा विधान मतदारसंघप्राप्त नामनिर्देशन पत्र निरंकनामनिर्देशन पत्र विक्री २३व्यक्ती ४० फॉर्म नेले. ०४१ मेळघाट विधानसभा मतदारसंघप्राप्त नामनिर्देशन निरंकनामनिर्देशन विक्री २३व्यक्ती फॉर्म नेले ४१अचलपुर विधानसभा मतदारसंघप्राप्त नामनिर्देशन निरंकनामनिर्देशन विक्री ३०व्यक्ती फॉर्म नेले १७

ऑक्टोबर हीट'; दिवाळीनंतरच गुलाबी थंडीची चाहूल

उकाड्याचा नागरिकांना त्रास पावसाच्या सरींमुळे अधिकची भर, आरोग्याच्या समस्या

विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती

अद्यापपर्यंत जिल्ह्यात गुलाबी थंडीची चाहूल लागलेली नाही. रात्रीही वातावरणात उष्णता असल्यामुळे उकाड्याचा त्रास कायम आहे. दिवसाही उकाडा जाणवत आहे. मागील काही दिवसांपासून ढग दाटून येत असल्यामुळे दिवाळीनंतरच जिल्हावासीयांना गुलाबी थंडीचा अनुभव घेता येणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

मागील काही वर्षांपासून वातावरणात बदल होत असल्यामुळे उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा या तिन्ही ऋतूंवर परिणाम होत आहे. यंदाही पावसाचे आगमन जूनमध्येच झाले असले तरी पावसाचे प्रमाण मात्र असमतोल होते त्यानंतर मात्र सप्टेंबर मध्ये पावसाचे प्रमाण अधिक होते त्यामुळे थंडीसाठी पोषक वातावरण सध्या तरी निर्माण होतांना दिसून

येत नाही.

दिवसा कडक ऊन, रात्री उकाडा

सध्या दिवसा कडक ऊन तापत आहे, तर रात्रीच्या वेळी प्रचंड उकाडा कायम आहे. यामुळे नागरिकांना गुलाबी थंडीची प्रतीक्षाच आहे. घराघरात पंखे, कुलर लागले आहेत. अद्यापही जिल्ह्यात ऑक्टोबर हीटचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येत आहे. त्यातच सायंकाळदरम्यान ढग दाटून येत आहे. काही भागांत पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे रविवारी काही काळ वातावरणात गारवा जाणवला. सोमवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. त्यामुळे थंडीसाठी पोषक वातावरण सध्या तरी निर्माण झाले नसल्याचे दिसते. वातावरण बदलामुळे थंडीचे आगमन उशिराच होणार असल्याचे बोलले जात जात आहे.

थंडीची प्रतीक्षाच

दरवर्षी ऑक्टोबरमध्येथंडीची चाहूल लागतेः परंतु यावेळी मात्र अद्यापही थंडी जाणवत नसून, वातावरणातील बदलामुळे जिल्हावासीयांना थंडीची प्रतीक्षाच असून, दिवाळीनंतरच थंडी वाढेल, असा अंदाज हवामान तज्छांकडून व्यक्त केला जात आहे.

नामांकनासाठी सहा तर प्रचाराला १३ दिवस

दोन दिवस सुटीचे : उमेदवारांची धावपळ वाढणार

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

विधानसभा निवडणुकीसाठी आज २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. दरम्यान, शनिवार व रविवार अशा दोन सुट्या आल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ सहा दिवस मिळणार आहेत. त्यामुळे २८ व २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर प्रचारासाठी केवळ १३ दिवस मिळणार असल्याने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची चांगलीच धावपळ होऊ शकते.

निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम १५ ऑक्टोबरला जाहीर केला. तेव्हापासूनच इच्छुकांमध्ये धावपळ सुरु झाली. विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील

आरमोरी, गडचिरोली व अहेरी या तीनही मतदारसंघांत २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी दाखल करता येणार आहे. २६ ला चौथा शनिवार, तर २७ ला रविवार आहे. त्यामुळे उमेदवारीअर्ज दाखल करण्यास केवळ सहादिवस मिळतील.४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे. त्याच दिवशी निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होईल.शिवाय, त्याच दिवशी उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे.त्यानंतरच निवडणूक प्रचाराला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून, त्यापूर्वी १८ नोव्हेंबरला प्रचाराच्या तोफा थंडावतील. त्यामुळेच प्रचारासाठी उमेदवारांना केवळ १३ दिवस मिळणार आहेत.

बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना जामीन मंजूर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२मुंबई

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि इतरांविरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गेल्या दोन वर्षांपासून तुरुंगात असलेले बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना जामीन मंजूर झाला आहे. देशमुख यांच्यासह अन्य आरोपी जामिनावर बाहेर आहेत, त्यामुळे सचिन वाझे यांनीही जामिनासाठी याचिका केली होती. सचिन वाझे हे गेल्या काही महिन्यांपासून तुरुंगात होते. त्यांच्यावर उद्योगपती मुकेश अंबानी

यांच्या अँटिलिया या निवासस्थानाच्या बाहेर जिलेटिनच्या कांड्या ठेवल्याचा आणि धमकीचा आरोप आहे. तसेच मन्सुख हिरेन हत्या प्रकरण आणि १०० कोटींच्या खंडणी प्रकरणात ते आरोपी आहेत. दरम्यान, खंडणीच्या गुन्ह्यात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना विशेष सीबीआय न्यायालयाने गेल्यावर्षीच जामीन दिला होता. परंतु, इतर दोन गुन्ह्यांत आरोपी असल्याने त्यांचा तुरुंगवास लांबला.

नोव्हेंबरपासून उडणार लग्नाचा बार; आठ महिन्यांत लग्नाचे ५२ मुहूर्त

कुटुंबियांची धावपळ : सर्वाधिक मुहूर्त फेब्रुवारी व मे महिन्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

यंदा नोव्हेंबरपासून लग्नाचे मुहूर्त आहे. पुढील आठ महिन्यांत ५२ मुहूर्त आहेत. यातील तब्बल २१ मुहूर्त फक्त फेब्रुवारी आणि मे या दोन महिन्यांत आहेत. लग्न इच्छुकांच्या डोक्यावर यंदा नोव्हेंबरपासूनच अक्षता पडण्यास प्रारंभ होणार आहे.

यावर्षी १८ नोव्हेंबरपासून लग्न सोहळ्यांच्या मुहूर्ताला प्रारंभ होत आहे. लग्न जुळलेल्यांच्या कुटुंबीयांनी आतापासून मंगल कार्यालये आरक्षित करण्यास सुरुवात केली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा लग्नसराईचा कालावधी आठ महिन्यांचा आहे. नोव्हेंबर ते जून या काळात लग्नासाठी एकूण ५२ शुभ मुहूर्त आहेत. त्या अनुषंगाने इच्छुकांची तयारी सुरू झाली आहे.वर-वधू मंडळीही लग्नाच्या तयारीत

आठ महिन्यांतील विवाहयोग्य मुहूर्त

नोव्हेंबर १८, २२, २५, २७
डिसेंबर १, २, ५, ६, ११
जानेवारी १६, १९, २०, २३, २४, २९, ३०
फेब्रुवारी- २, ३, ७, १६, १९, २०, २१, २३, २६
मार्च २, ३, ६, ७
एप्रिल- १६, १८, २०, २१, २३, २५, ३०
मे-१, ७, ८, ९, ११, १८, १९, २२, २३, २५, २८
जून १, २, ३, ४

व्यस्त आहेत. अनेक सामाजिक संस्था व मंडळांनी विवाह इच्छुक वर-वधूचे मेळावे आयोजित करून लग्नाच्या रेशीमगाठी बांधण्यात सहकार्याची भूमिका घेतली आहे. विविध ठिकाणी मेळाव्यांचे आयोजन पार पडत आहेत.

नोव्हेंबर ते जून या आठ

मे महिन्यातील मुहूर्ताला पसंती

मे महिन्यात शाळा-महाविद्यालयांना सुटी असल्यामुळे या दिवसातील मुहूर्त साधण्यात येतात. गेल्या मे महिन्यात नेमके मुहूर्त नव्हते. मात्र, यंदा नवीन वर्षात मे महिन्यात मुहूर्त अधिक असल्याने सर्वाधिक लग्न मे महिन्यातच होण्याची शक्यता आहे.

महिन्यांच्या काळात एकूण ५२ मुहूर्त आहेत. पैकी फेब्रुवारीमध्ये १०, मे महिन्यात ११ मिळून एकूण २१ असे मुहूर्त आहेत. सर्वांत कमी मुहूर्त डिसेंबर, मार्च व जून महिन्यात आहेत. मुहूर्त निवडून वधू- वरांच्या कुटुंबीयांनी नियोजन करण्यास सुरुवात केली आहे.लग्नानंतर वैवाहिक जीवनाला सुरुवात होते. विवाह सोहळा हा दोन कुटुंबांतील महत्त्वाचा आनंद सैहळा असतो. यासाठी प्रशस्त मंगल कार्यालय, पार्किंग व्यवस्था असलेल्या ठिकाणांना अधिक पसंती दिली जाते. धावपळ टाळण्यासाठी बुकिंगला सुरुवात झाली आहे.

गोपालकाला व पालखी प्रदक्षिणेने पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२ गुरुकुंज आश्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप गुरुकुंज ते मोझरी पालखीप्रदक्षिणा गोपालकाला, महाप्रसाद व खंजिरी भजनाने करण्यात आला. गुरुकुंज आश्रमात आठ दिवसचाललेल्या पुण्यतिथी महोत्सवात, सामुदायिक ध्यान व सामुदायिक प्रार्थना त्यावरील चिंतन, ग्रामगीताप्रवचन, आरोग्य व रक्तदान शिबिर, खंजिरी भजन, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, कीर्तन संमेलन इत्यादीकार्यक्रम घेण्यात आले होते. गोपालकाल्याची सुरुवात संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज या संतांच्या क्रांतीकारी अभंगाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. काल्याचे कीर्तन सचिन पवारह्यांनी सादर करतांनी असे सांगितले की, ज्या संतांच्या मागे जायचे आहे त्यांच्या विचारांची चिकित्सा अगोदरकरावी तसेच या संतांच्या मागनि जात असतांना कृतीवर संयम व बोलण्यावर नियंत्रण ठेवले तरच

संतांचाबोध प्राप्त होतो. राष्ट्रसंतांच्या साहित्यात सर्वधर्माचा सार असल्यामुळे त्यांचा विचारांचा प्रसाद घेऊन त्यांचेसाहित्य घरी सोबत न्यावे हाच खरा गोपालकाला आहे. काल्याच्या या कीर्तनाला साथसंगत रघुनाथकर्डीकर, श्रीकृष्ण झगेकर, शरद हिवराळे, श्रीकांत भोजने, भाष्कर काळे, बाळा बेलनकर, पंकज पोहोकार,पराग पदवाड, दिलीप कराळे, गजानन गायकवाड, राजेंद्र आकोटकर यांनी केली. पुण्यतिथी महोत्सवाच्यासमारोपीय कार्यक्रमाला संचालक मंडळाच्या अध्यक्ष पुष्पा बोंडे, सर्वाधिकारी लक्ष्मण गमे, उपसर्वाधिकारीदामोदर पाटील, प्रचार प्रमुख प्रकाश वाघ, सरचिटणीस जनार्दन बोथे, आजीवन प्रचारक लक्ष्मणदास काळे,ग्रामगीता जीवन विकास परीक्षा विभाग प्रमुख गुलाब खवसे, आरोग्य विभाग प्रमुख डॉ. पुरुषोत्तम पाळेकर,ॲड. दिलीप कोहळे, रामदास देशमुख यांच्यासह कार्यकारिणी सदस्य, जीवन व आजीवन प्रचारक तसेचविशेष अतिथी म्हणून सयाजी महाराज, नाना महाराज परसोडीकर, मधुकर खोडे महाराज, डॉ. सुनीलसूर्यवंशी, अभिजीत बोके, आचार्य हरिभाऊ वेरूळकर, बापूसाहेब देशमुख, श्रीकृष्ण गिरीधर इत्यादीउपस्थित होते. त्यांचे अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाच्यावतीने यावेळी शाल व श्रीफळ देऊन सत्कारकरण्यात आला. या प्रसंगी लक्ष्मणदास काळे, लक्ष्मण गमे, सुनील सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेत आढळले ५६ कर्मचारी लेटलतीफ

डेप्युटी सीईओंचा दणका : कारणे दाखवा

विदर्भ प्रजासत्ताक
दि२२ अमरावती

शासकीय कार्यालयात येण्या-जाण्याची वेळ निश्चित करून दिलेली असताना याला फाटा देत सोमवारी जिल्हा परिषद कार्यालयात उशिरा येणारे ५६ लेटलतीफ पकडण्यात आले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या मार्गदर्शनात सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस यांनी ही कारवाई केली आहे. या सर्व लेटलतीफ कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.

शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाने कार्यालयात येण्या जाण्यासाठीची वेळ निश्चित करून दिलेली आहे. पाच दिवसांचा आठवडा लागू केल्यापासून शासनाने शासकीय कार्यालयात येण्यासाठीची वेळ सकाळी ९:४५ वाजता आहे आणि घरी जाण्यासाठीची वेळ सांयकाळी ६:१५ वाजताची आहे. असे असताना सोमवार, २१ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद मुख्यालयातील विविध विभागांत कार्यरत असलेल्या ५६ कर्मचाऱ्यांनी शासकीय कार्यालयात येण्याच्या ९:४५ वाजेच्या वेळेला तिलाजंली देत उशिरा कार्यालय गाठले. दरम्यान, सीईओंच्या मार्गदर्शनात सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओ बालासाहेब बायस यांनी विविध विभागांत कार्यरत असलेले हजेरी रजिस्टर आपल्या ताब्यात घेतले. या हजेरी रजिस्टरची तपासणी केली असता यामध्ये जिल्हा परिषद मुख्यालयातील ११ विभागांमधील ५६, कर्मचारी लेटलतीफ असल्याचे आढळून आले. डेप्युटी सीईओंनी विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचे सकाळी १० वाजता हजेरी रजिस्टर ताब्यात घेतल्याची चर्चा पसरताच लेटलतीफ कर्मचाऱ्यामध्ये एकच खळबळ उडाली. दरम्यान, लेटलतीफ आढळून आलेल्या ५६ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओ बालासाहेब वायस यांनी दिली.

बडनेरा स्टेशनवरील कामामुळे २५ पर्यंत ८ गाड्या शॉर्ट टर्मिनेट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२२अमरावती

भुसावळ विभागातील बडनेरा येथील यार्ड रिमॉडेलिंगच्या कामासाठी २५ ऑक्टोबरपर्यंत ८ गाड्या शॉर्ट टर्मिनेटेड करण्यात आल्या आहेत. त्या आधीच्या स्टेशनपर्यंतच येतील व तेथूनच सुटतील.गाडी क्र. ०९२१२ नाशिक रोड - बडनेरा मेमू विशेष मूर्तिजापूर येथवर शॉर्ट टर्मिनेट केली आहे. तसेच

गाडी क्र. ०१३६५ भुसावळ - बडनेरा मेमू मूर्तिजापूर येथे शॉर्ट टर्मिनेट केली आहे.

०१३६८ नरखेड - बडनेरा मेमू नवी अमरावती अकोली स्टेशनपर्यंत, गाडी क्र. ०१३७० नरखेड-बडनेरा मेमू नवी अमरावती येथे शॉर्ट टर्मिनेट केली आहे. त्याचप्रमाणे पूर्व नॉन इंटरलॉकिंग कामादरम्यान गाडी क्र. ०९२११ बडनेरा - नाशिक रोड मेमू विशेष मूर्तिजापूर येथून, गाडी क्र. ०१३६६ बडनेरा - भुसावळ मेमू मूर्तिजापूर येथून आपल्या नियोजित वेळी सुटेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०९३६७ बडनेरा -नरखेड मेमू आणि गाडी क्र. ०९३६९ बडनेरा - नरखेड मेमू नवी अमरावती अकोली स्टेशनवरून आपल्या नियोजित वेळी निघेल. २५ ऑक्टोबरपर्यंत कोणत्याही मेमू गाड्या बडनेरा स्टेशनवर जाणार नाहीत. कारण बडनेरा स्टेशनवरून या प्लॅटफॉर्म क्र. ३ किंवा ४ वरून सुटतात. नेमके या दोन्ही प्लॅटफॉर्मवर हे काम केले जात आहे. मात्र, प्लॅटफॉर्म क्र. १ व २ वर कोणतेही काम नसल्यामुळे लांब पल्ल्याच्या सर्व गाड्यांच्या वाहतुकीस कोणतीही अडचण नसल्याचे मध्य रेल्वेद्वारे कळवण्यात आले आहे. प्रवाशांना सण-उत्सवांच्या काळात होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाने दिलगिरी व्यक्त केली आहे.